## L. A. BILL No. XIV OF 2021.

A BILL

FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA PUBLIC UNIVERSITIES ACT, 2016.

**सन २०२१ चे विधानसभा विधेयक क्रमांक १४.**

**महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ यात आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक.**

**(विधानसभेने दिनांक ५ जुलै २०२१ रोजी संमत केल्याप्रमाणे.)**

२०१७ चा महा. ६.

**ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांकरिता, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ यामध्ये आणखी सुधारणा करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या बाहत्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

**१.** या अधिनियमास, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ (सुधारणा) अधिनियम, २०२१, असे म्हणावे. संक्षिप्त नाव.

(शा.म.मु.) एचबी ५२०–१ (३४५–७-२०२१)

सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६ याच्या कलम १०९ ची सुधारणा.

**२.** महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ याच्या कलम १०९ मध्ये, पोट-कलम (३) मधील,— २०१७ चा महा. ६.

(एक) खंड (च) मधील, दुसऱ्या परंतुकानंतर, पुढील परंतुक समाविष्ट करण्यात येईल :—

“ परंतु आणखी असे की, सन २०२१-२०२२ या शैक्षणिक वर्षासाठी, विहित कालमर्यादेत विद्यापीठाला प्राप्त झालेल्या अनुपालन अहवालाची अधिष्ठाता मंडळाकडून छाननी करण्यात येईल आणि तो ३१ जुलै २०२१ रोजी किंवा त्यापूर्वी, व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेसह, राज्य शासनाला पाठविण्यात येईल; ” ;

(दोन) खंड (छ) मधील, दुसऱ्या परंतुकाऐवजी, पुढील परंतुक दाखल करण्यात येईल :—

“ परंतु आणखी असे की, सन २०२१-२०२२ या शैक्षणिक वर्षासाठी, या खंडान्वये ३१ ऑगस्ट २०२१ रोजी किंवा त्यापूर्वी अंतिम मान्यता देता येईल. ”.

## उद्देश व कारणे यांचे निवेदन

कोविड-१९ सार्वत्रिक साथरोगाचा फैलाव झाल्यामुळे, १४ एप्रिल २०२१ पासून राज्यामध्ये घोषित केलेली टाळेबंदी विचारात घेता, विद्यापीठांच्या कामकाजासह राज्यातील सर्व सामाजिक आणि आर्थिक कार्ये थांबलेली आहेत.

२. महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (२०१७ चा महा. ६) याच्या विद्यमान तरतुदींनुसार, नवीन महाविद्यालय किंवा परिसंस्था सुरू करण्यासाठी इरादा पत्राकरिता अर्ज करणे, अर्जाची छाननी करणे, इरादा पत्र देणे, इरादा पत्राच्या शर्तीचे अनुपालन करणे, इत्यादींसाठी कालमर्यादा दिलेली आहे. महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ याच्या कलम १०९ च्या पोट-कलम (३) च्या खंड (च) मध्ये अशी तरतूद आहे की, कालमर्यादेमध्ये प्राप्त झालेल्या अनुपालन अहवालाची, अधिष्ठाता मंडळाद्वारे छाननी करण्यात येईल आणि ज्या कालमर्यादेत अनुपालन अहवाल प्राप्त झाला असेल त्या कालमर्यादेतील मे महिन्याच्या पहिल्या दिवशी किंवा त्याआधी तो, व्यवस्थापन परिषदेच्या मंजुरीसह राज्य शासनाकडे पाठविण्यात येईल. उक्त पोट-कलम (३) च्या खंड (छ) मध्ये अशी तरतूद आहे की, राज्य शासनास, विद्यापीठाचा अहवाल विचारात घेतल्यानंतर, ज्या वर्षात असे नवीन महाविद्यालय किंवा परिसंस्था सुरू करण्याचे प्रस्तावित केले आहे त्या वर्षाच्या १५ जून रोजी किंवा त्यापूर्वी, त्यास योग्य व उचित वाटेल अशा व्यवस्थापनास अंतिम मान्यता देता येईल. तथापि, कोविड-१९ सार्वत्रिक साथरोगाचा फैलाव झाल्यामुळे, उक्त अधिनियमामध्ये विहित केलेल्या कालमर्यादेचे पालन करणे शक्य नाही.

म्हणून व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेसह राज्य शासनास अनुपालन अहवाल पाठविण्याची तारीख वाढविणे आणि शासनाद्वारे नवीन महाविद्यालय किंवा परिसंस्था सुरू करण्यास अंतिम मान्यता देण्याची तारीख वाढविणे आवश्यक आहे. या प्रयोजनासाठी, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ याच्या कलम १०९ मध्ये यथोचित सुधारणा करणे इष्ट वाटते.

३. वरील उद्दिष्टे साध्य करणे, हा या विधेयकाचा हेतू आहे.

मुंबई,
दिनांक ४ जुलै, २०२१.

**उदय सामंत,**
उच्च व तंत्र शिक्षण मंत्री.

ɣ

## सन २०२१ चे वि.स. विधेयक क्रमांक १४—महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ (सुधारणा) विधेयक, २०२१ याचे परिशिष्ट

**(महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ यातील उतारे)**

**(सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६)**

**१.** ते **१०८.** ** ** **

**१०९.** (१) व (२) ** ** ** नवीन महाविद्यालय किंवा नवीन पाठ्यक्रम, विषय, विद्याशाखा, तुकडी सुरू करण्यासाठी परवानगी देण्याची कार्यपद्धती.

(३) (क) ते (ङ) ** ** **

(च) उपरोक्त कालमर्यादेत मिळालेल्या अशा अनुपालन अहवालाची अधिष्ठाता मंडळाद्वारे छाननी करण्यात येईल आणि ज्या उपरोक्त कालमर्यादेत अनुपालन अहवाल प्राप्त झाला असेल त्या कालमर्यादेतील मे च्या पहिल्या दिवशी किंवा त्याआधी व्यवस्थापन परिषदेच्या मंजुरीसह राज्य शासनाकडे पाठविला जाईल. अधिष्ठाता मंडळाच्या व व्यवस्थापन परिषदेने मंजुरी दिलेल्या शिफारशींना व्यवस्थापन परिषदेला उचित वाटेल अशा संबंद्ध कारणांनी यथोचितरित्या पुष्टी देण्यात येईल :

परंतु, खंड (ङ) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कालमर्यादेत, जर व्यवस्थापन इरादा पत्रातील शर्तीचे अनुपालन करण्यात कसूर करील तर, इरादा पत्र व्यपगत झाल्याचे समजण्यात येईल :

परंतु तसेच, अपवादात्मक प्रकरणात आणि कारणे लेखी नमूद करून राज्य शासन, विद्यापीठाने योग्यरीत्या प्रक्रिया केलेल्या व्यवस्थापनाच्या अर्जावर वेळोवेळी, इरादा पत्राची वैधता, एकूण बारा महिन्यांपेक्षा जास्त नसेल अशा आणखी कालावधीसाठी वाढवू शकेल ;

(छ) खंड (च) खालील विद्यापीठाचा अहवाल विचारात घेतल्यानंतर, राज्य शासनाच्या अर्थसंकल्पीय तरतुदी, आणि इतर संबंद्ध घटक, नवीन परिसंस्था चालू करण्याची परवानगी मागणाऱ्या व्यवस्थापनाची योग्यता इत्यादी लक्षात घेऊन, राज्य शासन, आपल्या निरपवाद स्वेच्छानिर्णयानुसार, त्यास योग्य आणि उचित वाटेल त्याप्रमाणे अशा व्यवस्थापनास अंतिम मंजुरी देऊ शकेल. या खंडाखालील अंतिम मंजुरी ही, असे नवीन महाविद्यालय किंवा परिसंस्था चालू करण्याच्या प्रस्तावित वर्षाच्या १५ जून रोजी किंवा त्यापूर्वी देण्यात येईल. अशी मान्यता राज्य शासनाकडून विद्यापीठाला कळविण्यात येईल. त्यानंतर दिलेल्या मान्यता ह्या, विद्यापीठाकडून केवळ त्यानंतरच्या शैक्षणिक वर्षातच अंमलात आणल्या जातील :

परंतु, तसेच अपवादात्मक प्रकरणांमध्ये आणि कारणे लेखी नमूद करून, राज्य शासनास, विद्यापीठाने शिफारस न केलेल्या कोणत्याही अनुपालन अहवालास मान्यता देता येईल.

“ परंतु आणखी असे की, शैक्षणिक वर्ष, २०२०-२०२१ साठी, व्यवस्थापनाकडून प्राप्त झालेले अनुपालन अहवाल राज्य शासनास सादर करण्याची तारीख आणि शैक्षणिक वर्ष, २०२०-२०२१ साठी, शासनाने नवीन महाविद्यालय किंवा परिसंस्था सुरू करण्यास अंतिम मान्यता देण्याची अखेरची तारीख, वाढविण्याच्या दृष्टीने, यातील तक्त्याच्या स्तंभ (२) मध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे, पोट-कलम (३) च्या खंड (च) व (छ) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या तारखा या, उक्त तक्त्याच्या स्तंभ (३) मध्ये तरतूद केल्याप्रमाणे वाचण्यात येतील :—

| खंड<br>(१) | विद्यमान तरतुदीमधील तारीख<br>(२) | शैक्षणिक वर्ष, २०२०-२०२१ साठी तारीख<br>(३) |
|---|---|---|
| (च) | १ मे रोजी किंवा त्यापूर्वी | ३० जून २०२० रोजी किंवा त्यापूर्वी |
| (छ) | १५ जून रोजी किंवा त्यापूर्वी | ३१ जुलै २०२० रोजी किंवा त्यापूर्वी.”; |

(४) ते (९) ** ** **

**११०.** ते **१४८.** ** ** **

**अनुसूची.**

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

**[सन २०२१ चे विधानसभा विधेयक क्रमांक १४.]**

**[ महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६**
**यात आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक.]**

[**श्री. उदय सामंत,**
उच्च व तंत्र शिक्षण मंत्री.]

**[ विधानसभेने दिनांक ५ जुलै २०२१ रोजी**
**संमत केल्याप्रमाणे.]**

**राजेन्द्र भागवत,**
सचिव,
महाराष्ट्र विधानसभा.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई